REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 4 | JANUARY - 2018
UGC APPROVED JOURNAL NO. 48514

# उत्खनन : स्त्रियांच्या जगण्यातील वास्तवता

प्रा. सुभाष कदम
केबीपी कॉलेज, पंढरपूर.

**प्रास्ताविक :-**

स्त्रीवादी साहित्य प्रवाहातील एक महत्त्वाची लेखिका म्हणून गौरी देशपांडे यांच्याकडे पाहिले जाते. इरावती कर्वे यांच्या पोटी गौरी देशपांडे यांचा जन्म १ फेब्रुवारी १९४२ रोजी पुणे येथे झाला. महर्षी धोंडो केशव कर्वे हे त्यांचे आजोबा होते. महर्षी कर्वे, दिनकर कर्वे व इरावती कर्वे या तीन पिढ्याच्या विचार व्यक्तिमत्त्वाचा वारसा त्यांना लाभला होता. १९७५ ते २००३ या काळातील एक महत्त्वपूर्ण लेखिका म्हणून त्यांना ओळखले जाते. स्त्रियांच्या व्यथा-वेदना आपल्या लेखनीतून व्यक्त करीत त्यांना स्वतंत्रपणे जगण्याचे बळ देणाचे कार्य त्यांनी केले. अशा या स्वच्छंदी जीवन जगणाऱ्या लेखिकेने मार्च २००३ रोजी जगाचा निरोप घेतला. गौरी देशपांडे यांनी कथा व कादंबऱ्या हे दोन्ही वाङ्मय प्रकार हाताळले आहेत. भारतीय स्वातंत्र्याची साठ वर्षे गौरी देशपांडे यांनी अनुभवली आहेत. यातूनच त्यांनी साठ वर्षात भारतीय स्त्री जीवनात झालेली स्थित्यंतरे अत्यंत धाडसाने कादंबरीत शब्दबद्ध केली आहेत. गौरी देशपांडे यांनी आधुनिक घुसमट आणि या घुसमटीतून बाहेर येऊन माणूस म्हणून जगण्यासाठी केलेली धडपड यांचे चित्रण कादंबरीत केले आहे. त्यांनी स्त्रीमनाची दखल घेऊनच आपल्या लेखनाला आकार दिला आहे. त्यांच्या कादंबऱ्यांची कथानके समर्पक, सूचक व विचार करायला लावणार अशी आहेत. १९६० नंतरच्या लेखिकांमध्ये गौरी देशपांडे ह्या अत्यंत महत्त्वाच्या लेखिका आहेत. त्यांच्या कादंबरीमध्ये स्त्री ही केंद्रस्थानी आहे. त्यांच्या कादंबरीतील आशयसूत्रे ही स्त्री भोवतीच अधिक फिरताना आढळतात. गौरी देशपांडे यांनी वैविध्यपूर्णरित्या स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू कादंबरीतून उलगडण्याचा प्रयत्न झालेला आहे. स्त्री-पुरुष संबंधाचे अत्यंत धीट वर्णन गौरी देशपांडे करतात. लग्नसंस्था आणि त्यामुळे होणारे बदलाचे स्वरूप. कुटुंबसंस्था, विविध नातेसंबंध या सर्वांचा वेध त्यांच्या कादंबरीतून घेतलेला दिसतो. गौरी देशपांडेच्या कादंबरीतील आशयसूत्रे पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.




**स्वतंत्र्य स्त्री**

गौरी देशपांडे यांच्या कादंबरीतील स्त्री समाजाने दिलेल्या चौकटीत बसणारी नसून तिचे स्वतंत्र अस्तित्व आहे. पुरुष आपला संरक्षक आहे हे ती मान्य करत नाही. सर्वार्थाने मुक्त असलेली ही स्त्री, तिला कोणाचाही त्रास नाही. ती कुणाच्या दबावाखाली दबलेली नाही. स्वत:चे निर्णय स्वत: घेणारी आहे. त्यामुळे तिला जसे वाटते तसे ती निर्णय घेऊ शकते. याविषयी हरिश्चंद्र थोरात म्हणतात, ''आपल्या बुद्धीला पटेल तसे वागण्याचे स्वातंत्र्य या नायिका घेऊ पाहतात. मात्र आपली बुद्धी असेच निर्णय का घेते आहे, आपल्याला हे स्वातंत्र्य कशासाठी हवे आहे, याचे ठाम उत्तर त्यांच्याजवळ आहे.''

कादंबरीतील स्त्रीला कधी–कधी वाटते की, माणूस कधी स्वतंत्र नसतोच. तो कोणत्या ना कोणत्या तरी बंधनात अडकलेलाच असतो. समाजाच्या, कर्तव्याच्या, प्रेमाच्या नाहीतर भुकेच्या बंधनात तो अडकलेला असतो. हे बंधन हा तुरुंगवास तिच्या मनास गुदमरुन टाकणारा वाटतो.

गौरी देशपांडे यांच्या नायिकांना कोणत्याही गोष्टीचे, नात्याचे ओझे घेऊन जगायला नको वाटते. त्यांना स्वत:च्या आत्मभानाची जाणीव झालेली आहे. त्यामुळे कोणताही निर्णय घेताना त्या आई–वडील, नवरा किंवा कोणत्याही व्यक्तिवर अवलंबून राहत नाहीत. मनाला पटेल, असाच निर्णय त्या घेतात.

### स्त्री–पुरुषसंबंध

गौरी देशपांडे यांच्या सुरुवातीच्या बऱ्याच कादंबरीमधून 'स्त्री–पुरुषसंबंध', स्त्रीला पुरुषाची, पुरुषाला स्त्रीची असलेल्या शारीरिक ओढ याविषयीचे चित्रण ठळकणपे आलेले दिसते. एखाद्याशी शारीरिक संबंध ठेवणे म्हणजे कुणाची तरी प्रतारणा करणे असे होत नाही. या गोष्टीचे चित्रण एक स्त्री किंवा पुरुष असे न करता एक व्यक्ती म्हणून ही होताना आढळते.

### कुमारी माता

गौरी देशपांडे यांच्या 'उत्खनन' कादंबरीतील स्त्रीया पुरूषांच्या वासनांध वृत्तीला बळी पडतात. स्त्रीला व्यभिचारातून अपत्य झाले तर तिला शिक्षा दिली जाते. मात्र व्यभिचार करणारा पुरूष उजळ माथ्याने गावभर हिंडत असतो. समाजातील या दुजाभावाचे चित्रण गौरी देशपांडे अत्यंत आगतिकपणे करताना आढळतात. हे चित्रण करीत असताना त्या स्त्री–पुरूष यात कोणताही आडपडदा ठेवत नाहीत. सगळे दोषारोपण स्त्रीच्या पदरी पडते. याचे वास्तव चित्रण कादंबरीतून येताना दिसते.

### निखळ प्रेमभावना

गौरी देशपांडे यांच्या कादंबरीमधून स्त्री–पुरुष संबंधाचे भडक चित्रण दिसत असले तरी तितक्याच प्रमाणात निखळ प्रेमही असलेले दिसते. गौरी देशपांडे यांच्या कादंबरीतील प्रेमाचे चित्रण निखळ स्वरूपाचे असलेले जाणवते. त्यांच्या या प्रेम भावनेमधून वासनेच्या पलिकडील निखळता अधिक जाणवते. ही प्रेमभावना व्यक्त करताना कोणताही संकुचितपणा जाणवत नाही. जे मनात आहे ते व्यक्त करणे हेच त्यांना अधिक योग्य वाटते.

### स्त्रीचे दुय्यम स्थान

गौरी देशपांडे यांच्या कादंबरीतील पुरुष शक्यतो विदेशात नोकरी करणारे आहेत. नायिका आपल्या देशामध्ये नोकरी करणाऱ्या किंवा त्यांच्याबरोबर फिरणाऱ्या आहेत. पण या दोघांची जडणघडण भारतीय संस्कृतीमध्ये झालेली दिसते. त्यामुळे बऱ्याच वेळा स्त्रीला दुय्यम वागणूक मिळते. 'उत्खनन' कादंबरीतील नायिका दुनियाला जेव्हा मूल होणार हे कळते त्यावेळी तिचा प्रियकर काहीही न सांगता तिला एकटीला टाकून निघून जातो. आपण तिला सोडून गेल्यानंतर तिच्या जीवनाचे काय होईल? आणि आपल्यापासून जन्मणाऱ्या मुलाला समाज स्वीकारेल का नाही? याचा कोणताच विचार तो करताना आढळत नाही. एकूणच गौरी देशपांडे यांच्या कादंबरीतील स्त्रीया या परदेश भ्रमण करणाऱ्या, बंडखोर दिसत असल्यातरी त्यांची जडणघडण ही भारतीय पारंपरिक समाजव्यवस्थेत झालेली आहे. त्यांची अवस्था, आधुनिकता आणि पारंपरिकता यामध्ये अडकते. कधी कधी तिच्या मनाचे दुभंगलेपण जाणवते, मनाच्या द्विधावस्थामध्ये ती स्वत:चे अस्तित्व हरवून बसते.

### विवाहसंस्थेची बदलती परिभाषा

गौरी देशपांडे यांच्या कादंबरीतील स्त्रियांनी लग्नाला नकार दिला असला तरी शारीरिक संबंधाना दिलेला नाही. पुरुष जसा राजरोसपणे स्त्रियांशी विवाहबाह्य संबंध ठेवतो तसे स्त्रियांबाबत होत नाही. तिच्या मते, ''लग्न केल्यानंतर स्वत:चा म्हणता येईल, असा पुरुष जवळ असणं ही चैन! आणि जगात कित्येक लाखांनी बायका, जबर किंमत भरुनही, आपल्या पुरुषांना कां चिकटून राहतात, का त्यांच्या शोधात असतात, ते नसले तर कां स्वत:ला वंचित समजतात, ते मला स्वच्छ उमजले!'' असे 'उत्खनन'मधील नायिका दुनियाला वाटते. तिला दयालसारखा सर्वांना मनात सामावून घेणारा व्यापक

मनाचा नवरा मिळाला म्हणून पण तिचीच मुलगी मणी लग्नाला नकार देते. लग्न न करता संसार थाटायची तिची इच्छा असते. पण दुनियाला वाटते की, संसार थाटायचा आहे तर लग्न का करू नये. पण मणीचे मत दुनियापेक्षा वेगळे असते. ती म्हणते, ''कशाला लग्न करायचं? मला मुलंबाळं नकोत, लौकिकाला काय जो धक्का बसेल, त्यानं माझं काही वाकड होणार नाहीये, पैशासाठी मी जब्बारवर अवलंबून नाही; मग हे उपचारच करण्यात काय अर्थ आहे? विशेषत: ते मान्य नसताना?'' दुनियाला मणीचे म्हणने पटत होते.

## वात्सल्याचे अनोखे चित्रण

इतर विषयांप्रमाणेच गौरी देशपांडे यांच्या कादंबरीतील आईचे वात्सल्य ताकदीने आविष्कृत होताना दिसते. गौरी देशपांडे यांच्या नायिका या 'व्यक्ती' म्हणून जगायला जास्त प्राधान्य देतात. स्वत:चे अस्तित्व त्या विसरायला तयार नसतात. 'उत्खनन' कादंबरीमधील नायिका दुनियेला शिक्षण घेत असतानाच आई होणार असल्याचे कळते. हे ऐकूण तिचा प्रियकर अनंता तिला सोडून जातो. दुनियाला मात्र आपण उद्ध्वस्त होतो की काय ही भीती वाटत असतानाच, तिची आई आणि वडील आपल्या मुलीच्या अपत्याला उजळ माथ्याने समाजात जन्माला घालण्याचा निर्णय घेतात. आपल्या मुलीच्या एका चुकीसाठी तिचे आयुष्य बरबाद करण्यापेक्षा तिचे आयुष्य तिला आपल्या मायेच्या छायेत पुढे चालवू द्यायचा निर्णय घेतात. आपल्या मुलीच्या प्रेमापोटीच आई-वडील हा निर्णय घेतात. हे ऐकून दुनियाला रडू कोसळते, ती आतल्या जीवाला सांगते, ''तू अन् मी! तू घाबरु नको!'' ('उत्खनन', पृ.११) आणि आयुष्यभर दुनिया आपल्या मुलीवर प्रेम करते. गौरी देशपांडे यांच्या कथा-कादंबरीतील वात्सल्य प्रेम हे त्यांच्या अनुभवातले, मनाच्या झऱ्यातून पाझरणारे, मनाला स्पर्शून जाणारे आणि व्याकूळ करणारे आहे.

## सामाजिकता

गौरी देशपांडे यांच्या कादंबरीमध्ये सामाजिक चित्रण जरी विस्तृत प्रमाणात दिसत नसले, तरी काही कादंबऱ्यांमधून त्याची ओझरती जाणीव होते. एक व्यक्तिगत गरज म्हणून सामाजिक बांधिलकीचे चित्रण येते. सामाजिक चित्रणाविषयी अविनाश सप्रे म्हणतात की, ''सामाजिक वास्तवाचे खाजगीकरण करणे हा गौरी देशपांडेच्या लेखनवृत्तीचा स्थायीभाव दिसतो. हा भाव इतक्या टोकाचा की, समाजसेवी स्वरूपाच्या संस्थेमध्मे काम करणे ही इथे कुठल्याही सामाजिक वृत्तीची गरज म्हणून न येता व्यक्तिगत, मानसिक गरजेचा तो भाग असतो.'' गौरी देशपांडे यांच्या नायिका एक समाजसेवेची आवड म्हणून हे काम करताना दिसत नाहीत. आपल्या जीवनामध्ये आलेल्या काही गोष्टीची परतफेड म्हणून किंवा स्वत:चा एकटेपणा घालविण्यासाठी किंवा थोड्याफार फरकाने का होईना नाईलाजास्तव या भूमिका स्वीकारताना दिसतात. याचा प्रत्यय 'उत्खनन' या कादंबरींतून सहज येतो.

## कुटुंबव्यवस्था

गौरी देशपांडे यांच्या काही कादंबऱ्यांमधून एकत्र कुटुंबपद्धतीचे चित्रण दिसते, जागतिक पातळीवरच्या व्यक्तिंचासुद्धा त्यामध्ये समावेश आहे. त्यामुळे त्या कुटुंबाला विस्तारित स्वरूप आलेले आहे. 'उत्खनन' या कादंबरीतून विस्तारित कुटुंबव्यवस्थेचे चित्रण आले आहे. 'उत्खनन'मधील कादंबरीमध्ये दुनिया या कादंबरीची नायिका, तिचे वडील बापू, आई, मुलगी मणी, नवरा दयाळ, तिचा प्रियकर अनंता, दुनियाची मैत्रीण अभया, अभयाचा मुलगा तीर्थकर, मुलगी मणी, मणीचा नवरा जब्बार, त्याचे आई वडील, मणीचा मित्र अर्णव, नोकर जमना, सखाराम ही सर्व एकत्र कुटुंबात वावरतात.

## नोकरदार स्त्रीया

गौरी देशपांडे मांच्मा कादंबरीतील स्त्रिया ह्या सर्वच नोकरी करणाऱ्या आहेत असे नाही. ज्या करतात त्या केव्हाही नोकरी सोडू शकतात. त्या पूर्णवेळ नोकरी करताना दिसत नाहीत. 'उत्खनन'मध्ये कादंबरीची नायिका दुनिया पुरातत्वशास्त्राचे संशोधन करते. 'दुनिया' आणि 'मणी' ह्या गौरी देशपांडे यांच्या नायिका कुणाचाही बांधीलकी न स्वीकारता स्वतंत्र मोकळे जीवन जगतात. त्यामुळे त्यांचे नोकरीमध्येही स्थैर्य दिसत नाही. त्या स्वच्छंदी आणि स्वतःचे निर्णय स्वतःच्या

मनाप्रमाणे घेणाऱ्या आहेत. याठिकाणी नोकरदार स्त्रियांच्या वैविध्यपूर्ण प्रश्नाविषयी गौरी देशपांडे यांनी मोकळेपणाने आपली मते मांडली आहेत.

## नातेसंबंधाचा शोध

'उत्खनन'मधील दुनिया लग्नाअगोदर आई होणार हे समजताच तिचा प्रियकर अनंता तिला सोडून निघून जातो. यावेळी ती उद्ध्वस्त होताना दिसते. पण तिच्या जीवनाला आधार देण्याचे काम तिचे वडील बापू, आई आणि नंतर दयाल करतात. दयाल हा दुनियाचा तिची मुलगी मणीसहीत स्वीकार करतो. आयुष्याच्या शेवटी थकल्यानंतर दुनियाला अनंताचे पत्र येते. ते पत्र बघून दुनियाला भूकंप झाल्यासारखे वाटते. त्यावेळी मणी आईला विचारते, ''आई, कुणाच पत्र? त्यावेळी दुनिया विचार न करता तिला उत्तर देते, तुझ्या वडिलांचं? नंतर तिच्या लक्षात येते आणि म्हणते, तुझ्या बापाच नाही, तर अनंत नावाच्या माझ्या जुन्या मित्राच आहे. त्याला कॅन्सर झाला आहे, आणि मला शेवटची भेटण्याची त्याची इच्छा आहे असे दुनिया मणीला म्हणते त्यावेळी मणी म्हणते, ''मित्राला बोलावून घे, आई! आपण त्याला अगदी बरं करुन टाकू बघ!'' दुनियाचा नवरा दयालही मणीसारखेच मत व्यक्त करतो आणि दुनियाला म्हणतो, ''लिहिलंस का पत्र? एकदम कुरियरनं पाठव. ब्रेन ट्युमरवर जितक्या लवकर सर्जरी करावी तितकी ती यशस्वी होण्याचे चान्सेस जास्त. त्याला म्हणावं, ताबडतोब ये. मी आणि मणी वाट बघतोय!' या दोघांचेही बोलणे ऐकून दुनियाला गहिवरुन येते. अनंताने दुनियाला तिला गरज होती त्यावेळी सोडून दिले असले तरी त्याच्यावर सूड घेण्यापेक्षा सर्वजण त्याला माणुसकीच्या नात्याने, प्रेमाने जवळ करताना दिसतात. हेच मानवीपणाचे लक्षण 'उत्खनन' कादंबरीती दुनियाच्या कुटुंबातून दिसून येते. गौरी देशपांडे यांच्या कादंबरीमध्ये सुरुवातीच्या नायिका 'स्व' ला महत्त्व देणाऱ्या आहेत. 'उत्खनन' मधील चित्रण मात्र अनेक मानवी नातेसंबंधांवर आधारलेले जाणवते. या कादंबरीतील व्यक्ती इतरांच्या सहाय्याने जीवन जगणे अधिक पसंत करतात. मानवी समूहाच्या सामाजिक सांस्कृतिक जीवनाचे भान या व्यक्तिरेखांना अधिक महत्त्वाचे वाटते. म्हणूनच गौरी देशपांडे यांच्या काही कादंबरीतून मानवी जीवनाच्या व्यापकपणाचे चित्रण आढळते.

## निष्कर्षः–

१. उत्खनन कादंबरीतील व्यक्तिरेखांना मानवी समूहाच्या सामाजिक सांस्कृतिक जीवनाचे भान महत्त्वाचे वाटते.
२. या कादंबरीमधून मानवी जीवनातील व्यापकता, दुसऱ्या माणसांविषयी असलेल्या मनातील ओलाव्याचे उत्खनन होताना दिसते.
३. गौरी देशपांडे यांनी आधुनिक घुसमट आणि या घुसमटीतून बाहेर येऊन माणूस म्हणून जगण्यासाठी केलेली धडपड यांचे चित्रण केले आहे.
४. सामाजिक वास्तवाचे खाजगीकरण करणे हा गौरी देशपांडेच्या लेखनवृत्तीचा स्थायीभाव आढळतो.
५. गौरी देशपांडे यांच्या कादंबरीतील स्त्रीया या परदेश भ्रमण करणाऱ्या, बंडखोर, स्वच्छंदी दिसत असल्यातरी त्यांची जडणघडण ही भारतीय पारंपरिक समाजव्यवस्थेत झालेली आढळते.
६. हृदयाला स्पर्श करून जाणारे विचार गौरी देशपांडे यांनी व्यक्त केले आहेत.

## संदर्भग्रंथसूची

१. देशपांडे गौरी, उत्खनन, मौज प्रकाशन, मुंबई, पाचवी आवृत्ती २०१७.
२. आठवलेकर मंगला, महर्षी ते गौरी, राजहंस प्रकाशन, पुणे, २०००.
३. संपा. बाळ विद्या, गिताली वि. मं., भागवत वंदना, मौज प्रकाशन, मुंबई, २००८.
४. संपा. बाळ विद्या, गीताली वि. मं., मिळूण साऱ्याजणी, ऑगस्ट २००३.